# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.03.2025** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या,**

१. प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन,

२. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी 6486 कोटी 20 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात सादर,

३. राज्य विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी येत्या 27 मार्चला मतदान,

आणि

४. चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताची ऑस्ट्रेलियाशी लढत.

**अधिवेशन**

सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला कालपासून मुंबईत राज्यपालांच्या अभिभाषणानं सुरुवात झाली. यावेळी राज्यपालांनी राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. देशाच्या एकंदर स्थूल उत्पादनात राज्याचं 14 टक्क्यांपेक्षा अधिक योगदान असून थेट परकीय गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पहिली पसंती असल्याचं ते म्हणाले. दावोसमध्ये झालेल्या 15 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या सामंजस्य करांराचा आणि त्यातून निर्माण होऊ शकणाऱ्या 15 लाखांहून अधिक रोजगाराच्या संधीचा उल्लेख त्यांनी केला. उद्योगांना चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी 5 हजार कोटी रुपयांचं अनुदान वितरीत करण्याची राज्य सरकारची योजना असून उद्योगांसाठी साडेतीन हजार एकर औद्योगिक भूखंड वितरीत करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असल्याचं राज्यपाल म्हणाले. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल राज्यपालांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे आभार मानले. राज्य सरकार या अंतर्गत उत्कृष्टता केंद्र आणि अनुवाद प्रबोधिनी स्थापन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. विधिमंडळातील इतर कामकाजविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून ...

**राज्य सरकारनं अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी काल 6486 कोटी 20 लाख रुपयांच्या पुरवणीमागण्या दोन्ही सभागृहात सादर केल्या. विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या मांडल्या. त्यात सर्वाधिक 3 हजार कोटी रुपयांहून अधिक मागण्या ग्रामविकास विभागाच्या आहे. केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत रस्ते आणि पूल प्रकल्पांसाठी बिनव्याजी कर्जासाठीनिधी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय**

**ग्रामीणआरोग्य योजना, पुणे रिंग रोड, अशा लोकोपयोगीआणि राज्याच्या पायाभूत विकासाला बळकटी देण्यासाठी निधीची तरतूद असलेल्या पुरवणीमागण्यांचा कालच्या मागण्यांमध्ये समावेश आहे. या मागण्यांवर 6 आणि 7 मार्च रोजी चर्चाआणि मतदान होणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्तावही दोन्हीसभागृहात मांडण्यात आला. विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तालिका सदस्यम्हणून योगेश सागर, बबनराव लोणीकर,दिलीप बनकर, सुनील राऊत, अमित झनक यांच्यानावांची घोषणा केली. विधानपरिषदेत निरंजन डावखरे, चित्रा वाघ, कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि सुनील शिंदे यांची तालिका सभापती म्हणून नेमणूक केल्याचं सभापती राम शिंदे यांनी जाहीर केलं. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयानं 2 वर्षांची शिक्षासुनावली आहे. याप्रकरणी सरकारनं भूमिका मांडावी,अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादासदानवे यांनी केली. याप्रकरणी न्यायालयानं सुनावणी करुन निर्णय राखून ठेवला आहे.न्यायालयाचा निर्णय आल्यावर राज्यपाल किंवा विधानसभा याबाबत निर्णय घेईल, असं निवेदनमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं. त्यानंतर दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यासह दिवंगत सदस्यांना  आदरांजली वाहण्यात आली आणि दोन्ही सभागृहाचं कामकाज तहकूब झालं.**
**आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून स्वाती महाळंक.**

**पटोले**

राज्यात गुन्हेगारी, बेरोजगारी असे अनेक प्रश्न असून सरकार केवळ घोषणाबाजीच करत आहे, अशी टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी काल केली. विधानभवन परिसरात ते प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. राज्यपालांच्या आजच्या अभिभाषणात एकही नवा मुद्दा नव्हता.  राज्यात महिला सुरक्षित नाहीत, उद्योगधंदे राज्याबाहेर चालले आहेत, शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत असून ग्रामीण भाग ओसाड पडत आहे, अशी टीका त्यांनी केली. महाविकास आघाडीतील ज्या पक्षाचे जास्त विधायक असतील त्या पक्षाचा विरोधी पक्ष नेता निवडला जाईल, असं सांगून ते म्हणाले....

**विधानसभेत शिवसेना हा मोठा पक्ष आहे त्यामुळे त्यांनी त्यांचा जाहीर केला पाहिजे त्याच प्रमाणे वरच्या सभागृहात परिषदेमध्ये कॉंग्रेस चे जास्त उमेदवार आहेत , त्यामुळे तिथ आम्ही आमचा विरोधी पक्ष नेता करू ,आणि सामंजस्याने या राज्याच्या प्रतिमेला भ्रष्ट आणि महाराष्ट्राला रोज काळिमा लावणाऱ्या या सरकारला घेराबंदी कशी करता येईल , याच्यावर आराखडे आम्ही करतोय , सामंजस्याने हा जो विरोधी पक्ष पदाचा प्रश्न आहे तो आम्ही सोडवू.**

**तटकरे**

“मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच 7 मार्च रोजी सर्व लाभार्थींना दिला जाईल. मार्च महिन्याचा हप्ता अर्थ खात्यातून निधी मिळाल्यानंतर देण्यात येईल”, अशी माहिती राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे

यांनी काल विधानभवन परिसरात दिली. 2 कोटी 40 लाखांपेक्षा अधिक महिला या योजनेच्या लाभार्थी असल्याचं सांगून त्या म्हणाल्या,

**8 तारखेला शनिवार असून सुद्धा महिला लोकप्रतिनिधींसाठी पण आणि महिलांसाठीपण या सभागृहाचे विशेष सत्र होणार आहे पण त्याच बरोबर सगळ्यांची लाडकी योजना म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना याचा जो फेब्रुवारी चा हफ्ता आहे तो महिला दिनाच्या निमित्ताने सर्व बहिणींच्या खात्यावर जमा करून देणार आहोत.**

**निवडणूक**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. आमशा पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं त्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी 10 मार्चला अधिसूचना जाहीर होईल. अर्ज दाखल करण्यासाठीची मुदत 17 मार्च असून 18 मार्चला अर्जांची छाननी झाल्यावर 20 मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता वाटल्यास 27 मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी 5 वाजता मतमोजणी होणार आहे.

**मोदी**

वन्यजीवन व्यवस्थापनासाठी पारंपरिक ज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वापर करावा”, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. जागतिक वन्यजीव संरक्षण दिनानिमित्त काल मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुजरातमध्ये सासन गीर इथं राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची सातवी बैठक झाली. या बैठकीत पंतप्रधानांनी जुनागढ इथं वन्यजीवांसाठीच्या राष्ट्रीय संदर्भ केंद्राची पायाभरणी केली. तत्पूर्वी पंतप्रधानांनी गीर राष्ट्रीय उद्यानाची सफर केली.

**आंदोलन**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, शेतमालाला योग्य भाव तसंच शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांसाठी वाशीममध्ये काल काँग्रेसचे आमदार अमित झनक यांच्या नेतृत्वाखाली धरणं आंदोलन करण्यात आलं.

**उबाठा आंदोलन**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनंही काल शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी यवतमाळमध्ये आंदोलन करण्यात आलं.

**चव्हाण**

नांदेडमध्येही काँग्रेसच्या वतीने खासदार रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत याच मागण्यांसाठी महापालिकेसमोर तीव्र आंदोलन करण्यात आलं.

**पुतळा उभारणी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणमध्ये राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीच्या कामाला कालपासून विधिवत पूजन करून सुरुवात झाली. राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा 83 फूट उंच पूर्णाकृती पुतळा उभारला जातं आहे. पुतळ्याच्या उभारणीत डुप्लेक्स स्टेनलेस स्टील आणि ब्रॉन्झ धातू वापरला जात आहे.

**आढावा**

राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांनी काल दूरस्थ पद्धतीनं महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.  या हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नागरिकांमध्ये या कायद्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी व्यापक प्रचार आणि प्रसार मोहीम राबवण्याचे निर्देश श्रीवास्तव यांनी दिले.

**निधन**

ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर संस्थेच्या विश्वस्त, लेखिका आणि प्रेरणामय पद्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत तेवती ठेवणाऱ्या कवियत्री डॉक्टर स्वर्णलता भिशीकर यांचं काल रात्री सोलापूर इथं निधन झालं. त्या 73 वर्षांच्या होत्या. त्यांचं पार्थिव सकाळी साडेनऊपर्यंत सोलापूरमधील ज्ञान प्रबोधिनीच्या उपासना मंदिरात ठेवण्यात येणार असून सकाळी दहा वाजता मोदी स्मशानभूमीमध्ये त्यांच्या पार्थिव देहावर अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**क्रिकेट**

आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताची लढत आज ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. उपांत्य फेरीचा हा पहिला सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार आज दुपारी अडीच वाजता दुबई इथं रंगणार आहे. उपांत्य फेरीचा दुसरा सामना उद्या न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन संघांदरम्यान लाहोर इथं होणार आहे. उपांत्य फेरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या सामन्यात विजयी ठरणाऱ्या दोन्ही संघांची 9 मार्चला होणाऱ्या अंतिम सामन्यात लढत होईल.

**हवामान**

राज्याच्या सर्वच भागात कमाल तापमानात किंचित वाढ झाली असून उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**